क्रमांक : ३२

# महाराष्ट्र विधानसभा
## पत्रक भाग दोन
### दिनांक ८ मार्च, २०२१ / फाल्गुन १७, १९४२ (शके)

**संदर्भ :- या सचिवालयाचे पत्रक भाग दोन क्र.१, दिनांक ७ जानेवारी, २०२१**

**३२**. सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या गुरुवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत विधानसभेचे २०२१ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाचे कामकाज सोमवार, दिनांक १ मार्च, २०२१ ते बुधवार, दिनांक १० मार्च, २०२१ रोजीपर्यंत निश्चित करण्यात आले असून या कालावधीत प्रश्नोत्तरे घेण्यात येतील व उर्वरित प्रश्न व्यपगत होतील तसेच प्रश्नातून उद्भवणाऱ्या अर्धा - तास चर्चेच्या सूचना घेण्यात येणार नसल्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

त्यानुषंगाने दिनांक २ ते १० मार्च, २०२१ या कालावधीतील वस्तुस्थितीकरिता विभागाकडे पाठविण्यात आलेले प्रश्न तसेच दिनांक १२ ते १९ मार्च, २०२१ या कालावधीसाठी विभागाकडे पाठविण्यात आलेले तारांकित स्वीकृत प्रश्न, वस्तुस्थितीचे प्रश्न व सदस्यांना विचारण्यात आलेल्या खुलासा याबाबतचे प्रश्न तसेच प्रश्नातून उद्भवलेल्या अर्धा-तास चर्चेच्या प्राप्त झालेल्या सूचना व्यपगत करण्यात आल्या आहेत.

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : ८ मार्च, २०२१

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत :**

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष
(३) संगणक कक्ष (Website)